# भगवान महावीरांचा जीवन विचार

***जैन धर्म मानवतावादाचा जनक असून अहिंसा, अपरिग्रह, अस्तेय, सत्य व ब्रह्मचर्य अशी जीवनशैली हेच विश्व धर्माचे आधार असणार आहेत. सध्याच्या संघर्षमय, अतिरेकी वातावरणात जैन विचारांचा समृद्ध वारसा एखाद्या दीपस्तंभाप्रमाणे असून, सर्व तीर्थंकर मानवी कल्याणाचा मार्ग आजही दाखवत आहेत. जैन धर्मतत्त्वेच संपूर्ण मानव जातीला विश्व धर्माकडे नेऊ शकतील.***

जैन धर्माची ओळख अहिंसा तत्त्वांनी होते. सर्व प्रकारच्या हिंसा प्रकर्षाने वाढतात, या पार्श्वभूमीवर जैन धर्माचा उदय झाला. वैदिक पद्धतीतील कर्मकांड, यज्ञामध्ये पशुहिंसा होती. यातून मुक्तता करणारा व इतरांशी युद्ध करून साम्राज्यविस्तार करण्याऐवजी काम, क्रोध, मद, मोह, माया, मत्सर या शत्रूंना जिंकण्याचे जिन तत्त्व स्वीकारले गेले. आपण स्वतःवर विजय मिळवणे ही फार कठीण बाब असते. संघर्ष, युद्ध हे कोणत्याच प्रश्नाचे उत्तर असू शकत नाही. दया, परोपकार, स्नेह, प्रेम हीच महत्त्वाची शस्त्रे असून, त्यातून प्राप्त होणारा विजय शाश्वत राहतो. जिन पंचमहातत्त्वे हा जैन धर्माचा पंचप्राण असून, त्यामध्ये अहिंसा, अस्तेय/अचौर्य, अपरिग्रह, सत्य, ब्रह्मचर्य ही पंचसूत्रे किंवा महाव्रते स्वीकारल्याने सम्यक जीवनशैली प्राप्त होते. ही तत्त्वे व त्यांचा व्यावहारिक संदर्भ तपशिलाने पाहू.



जैन धर्म हाच मुळात हिंसेच्या विरोधात शांततापूर्ण क्रांती स्वरूपात उदयास आला. सर्व २४ तीर्थंकर हे युद्ध व हिंसेच्या सामाजिक परिणामाचे व त्यातून निर्माण होणाऱ्या अखंडित क्रोध साखळीचे खंडण करण्यासाठीच अहिंसेचे पुरस्कर्ते होते. शारीरिक हिंसा जेवढी वाईट, त्यापेक्षा अधिक सूक्ष्म व तीव्र अशी मानसिक अवस्था असते किंबहुना मानसिक हिंसा पुढे शारीरिक हिंसेमध्ये परिवर्तित होते म्हणूनच मुळावर घाव घालण्यासाठी मानसिक हिंसादेखील वर्ज्य केली. जैनधर्मीय बांधव पर्यूषण पर्वात संपूर्ण वर्षभर जाणते-अजाणतेपणी कोणाचे मन दुखावले असल्यास त्याची शक्यता विचारात घेऊन क्षमा मागतात. व्यवहारात आपण अकारण अनेक वेळा इतरांना अपमानित करतो. ही सूक्ष्म हिंसा पुढे क्रोध, द्वेष, संघर्ष याचे कारण बनते. आहार हा विचारांचाही पोषण करणारा असतो हे आता शास्त्रीय सत्य स्वीकृत झाले आहे. त्यामुळे अहिंसा पूर्णतः आचरणात आणण्यासाठी मांसाहारदेखील त्याज्य ठरतो. शुद्ध सात्त्विक आहार, तोही मर्यादित प्रमाणात, गरजेइतकाच घ्यावयाचा आहे. अन्न हे पूर्ण ब्रह्म असून, अन्नाचा अपमान होणार नाही, याची दक्षता घेणे हा व्यवहाराचा भाग ठरतो. यातूनच अनेक जैन कुटुंबांत आपल्या जेवणाचे ताट धुऊन ते पाणी पिण्याची प्रथा आहे.

अस्तेय हे तत्त्व जैन धर्माप्रमाणेच अनेक इतर धर्मांत मूलतत्त्व समाविष्ट आहे. जे आपले नाही दुसऱ्याचे आहे त्याची अभिलाषा ठेवणे, विनापरवाना विनामोबदला वापरणे हे सर्व टाळणे म्हणजे अस्तेय होय. हव्यास हेच चोरीचे मूळ असून, त्यातून सामाजिक व आर्थिक विषमता तयार होते. मात्र, एखाद्या व्यक्तीला, समाजाला जर जीवन जगण्याची साधनेच नाकारली तर ती व्यक्ती अथवा समाज चोरीचा मार्ग नाईलाजाने स्वीकारतो. याबाबत सम्यक ज्ञान कसे यावे याचे उदाहरण एका घटनेतून पाहू. अमेरिकेत चोरीचा खटला चालू होता. आरोपीने उपाशी असल्याने ब्रेड चोरल्याची कबुली दिली. न्यायालयाने त्याला दहा डॉलरची शिक्षा दिली; पण सोबतच न्यायालयात उपस्थित प्रत्येकाला दहा डॉलर दंड म्हणून चोरास द्यावे, असा चमत्कारिक निकाल दिला. न्यायाधीशांनी याचे कारण स्पष्ट केले की, चोरी करणारा जसा गुन्हेगार ठरतो, तसेच अशी परिस्थिती त्याच्यावर आणणारा समाजदेखील गुन्हेगारच ठरतो.

अस्तेय हे तत्त्व अतिपरिग्रह प्रवृत्तीशी जोडलेले असल्याने अपरिग्रह या महाव्रताचा विचार करावा लागतो. संपत्ती व उत्पन्नातील विषमता सातत्याने वाढत असून, हा अनुभव जागतिक स्तरापासून गावपातळीपर्यंत दिसतो. राजकीय क्षेत्रात पदाचा परिग्रह तीव्र असून, आपल्याच घराण्यात अधिक पदे असावीत असा प्रयत्न होत आहे. यातून संपत्ती संकलनाचे व्यसन वाढत असून, त्याचा परिणाम म्हणून केवळ एक टक्के लोकांकडे ४० टक्के लोकांकडील एकूण संपत्तीपेक्षा अधिक संपत्ती आहे. कोरोना महासंकटात आपण मदत देऊन परिग्रह कमी करू शकतो. भ्रष्टाचाराचे वाढते प्रमाण व त्याची साखळीबद्ध रचना हे देखील आत्यंतिक परिग्रहाचे फलित आहे.

सत्य आणि ब्रह्मचर्य ही महानैतिक जीवनाचा पाया आहेत. बहुआयामी असल्याने प्रत्येक निर्णय रत्नत्रयाच्या आधारे घेतल्यास सत्य महाव्रत याचे पालन होते. सत्याचा संस्कार कुटुंबापासून सुरू होत असल्याने आपले दैनंदिन वर्तन मुलांसमोर आदर्श होत असते, याची जाणीव महत्त्वपूर्ण ठरते. हव्यासातून येणारे समाधान, श्रीमंती अल्पकाळ असते. परंतु; नंतर येणारे नैराश्य सुखापेक्षा कितीतरी अधिकपट दु:खदायी असते.

महावीर किंवा महाविनाश असे दोनच पर्याय आता नवतंत्रयुगात उपलब्ध असून, आपण निवड केली नाही तर दुसरा पर्याय अनुभवावयास येईल याची खात्री आहे. संगणक क्रांतीनंतर आपण जैवतंत्र क्रांती, रोबोटिक्स , थ्रीडी प्रिंटिंग आणि कृत्रिम बुद्धिमत्ता असा प्रगतीचा प्रवास करत असून, आपण यंत्रे हाताळणारे न राहता यंत्रे आपणाला हाताळू लागतील. अत्यंत धोकादायक वळणाच्या या स्थितीत व्यावहारिक उत्तर जैन धर्म देऊ शकतो. मनुष्यरहित कारखाने, हॉटेल्स, चालकरहित वाहन हे रोजगार संपविणारे असून, त्यातून भरपूर रिकामा वेळ असणारी मोठी फौज तयार होईल. निर्णय घेण्याची क्षमता, विश्लेषण करण्याची क्षमता, अचूकता याबाबत प्रगत यंत्रमानव सहजरीत्या मानवावर आपली सत्ता प्रस्थापित करू शकते.

जैन धर्म मानवतावादाचा जनक असून, रत्नपुरीच्या आधारे घेतली जाणारी निर्णय प्रक्रिया आणि अहिंसा, अपरिग्रह, अस्तेय, सत्य व ब्रह्मचर्य अशी जीवनशैली हेच विश्व धर्माचे आधार असणार आहेत. स्त्री समानता शिक्षणातून येत असते हे ओळखून जैन समाजात स्त्रियांचे शिक्षण प्राधान्याने पाहिले जाते. २०११ च्या जनगणनेत स्त्री साक्षरतेत जैन समाज प्रथम क्रमांकावर होता. आपल्या समाजाचा हा सुवर्ण वारसा सध्याच्या संघर्ष, अतिरेकी वातावरणात एखाद्या दीपस्तंभाप्रमाणे असून, सर्व तीर्थंकर मानवी कल्याणाचा मार्ग आजही दाखवत आहेत. जैन धर्मतत्त्वे हीच संपूर्ण मानव जातीला विश्व धर्माकडे नेऊ शकतील.

**- डॉ. विजय ककडे**

(समन्वयक, भगवान महावीर अध्यासन,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर)